**विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे**
**१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१**
दुरध्वनी क्र.२०-२६१२५६९६ फॅक्स नं.०२०-२६१२२२१७
ई-मेल आय.डी.क्र. Dydpune@gmail.com वेब साईट-www.dydepune.com

जा.क्र./प्रशि-४/टे-२०५/व्य.कोटा/२०१८-१९/४५०४ दिनांकः 20 JUN 2018

प्रति,
प्राचार्य,
अनुदानित/विनाअनुदानित अध्यापक विद्यालय,
पुणे/अहमदनगर/सोलापूर

**विषय : डी.एल.एड.प्रथम वर्ष ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०१८-१९ बाबत...**

संदर्भ :१.मा.संचालक,म.रा.शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे-३० यांचेकडील पत्र क्र.२५८५,दि ४.६.२०१८
२.या कार्यालयाचे पत्र क्र.४२०१, दि ५.६.२०१८
३.मा.संचालक,म.रा.शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे-३० यांचेकडील पत्र क्र.२६६४, ८.६.२०१८
४.या कार्यालयाचे पत्र क्र.४३६३, दि १२.६.२०१८
५.परिषदेकडील पत्र क्र.२८००, दि २०.६.२०१८

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यांत येते की, मा.संचालक, म.रा.शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचेकडील संदर्भिय पत्र क्र.दि २०.६.२०१८ अन्वये अध्यापक विद्यालयांचे व्यवस्थापन कोटा प्रवेशाबाबतचे सुधारीत वेळापत्रक प्रसिध्द केले आहे.

सदर पत्रान्वये अध्यापक विद्यालयांनी व्यवस्थापन कोटा प्रवेशाचे वेळापत्रकाचे काटेकारपणे पालन करावयाचे असून सदरची व्यवस्थापन कोटा प्रवेश प्रक्रिया दिनांक **४ जून, २०१८ ते ३० जुन,२०१८** या कालावधीत पूर्ण करावयाची आहे. तसेच दिनांक **१० जुलै, २०१८** पर्यंत सदरचे प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव प्रस्तूत कार्यालयाकडे सादर करावयाचे आहे. दिनांक **१० जुलै, २०१८** नंतर आलेले प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

सोबत : परिषदेकडील दिनांक २०.६.२०१८ चे पत्र जोडले असून सदर पत्रात दिलेल्या सूचनेनुसार आपण व्यवस्थापन कोटा प्रवेशाबाबत तात्काळ कार्यवाही करावी.

MRaut

**(मिनाक्षी राऊत)**
**प्र.शिक्षण उपसंचालक,**
**पुणे विभाग, पुणे-१**

**प्रत : माहितीस्तव-**
१.मा.संचालक, म.रा.शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
२.प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था,पुणे/अहमदनगर/सोलापूर
२/-परिषदेकडील दि २०.६.२०१८ च्या पत्रातील सूचनेनुसार आपल्या जिल्हयातील सर्व अध्यापक विद्यालयांना व्यवस्थापन कोटा प्रवेशाबाबत वेळापत्रकाचे पालन करणेबाबत कळविण्यात यावे.